# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३९६-२२ दिनांक २९/१२/२०२२

## ३१ डिसेंबरच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस सज्ज.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी व सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नागरिक ३१ डिसेंबर रोजी मोठया प्रमाणात आनंदोत्सव साजरा करित असतात. सदरदिवशी रात्री ००:०० वाजता नवीन वर्षाचे स्वागतासाठी सामान्य नागरिक व महिलादेखील मोठया प्रमाणात घराबाहेर आलेल्या असतात. मात्र काहि मद्यपी व्यक्ती अशावेळी मद्यपान करुन वाहने चालविणे, सार्वजनिक ठिकाणी दंगामस्ती करणे अशाप्रकारचे कृत्य करतांना आढळून येतात. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे अनुचित प्रकार घडू नये याकरिता मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने मोठा प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार असून टवाळखोरी करणारे, मद्यपान करुन वाहन चालविणारे तसेच बेदरकापणे वाहन चालविणाऱ्या व बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी आयुक्तालयातील काशिमिरा, वसई व विरार या तिनही वाहतूक शाखेकडून व पोलीस ठाणे यांचेकडून ठिकठिकाणी नाकाबंदी लावण्यात येणार असून ब्रीथ ॲनालाइझरद्वारे तपासणी करुन कारवाई करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार यांचेवर पोलीसांची करडी नजर राहून महत्वाच्या ठिकाणी साध्या वेशातील गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार हे देखील संशईतावर पाळत ठेवणार आहे. यावेळी महाराष्ट्र शासनाने सदरदिवशी सकाळी ५ वाजेपावेतो उपहारगृहे व बार चालविण्यास मुभा दिलेली आहे. त्याचप्रमाणे आस्थापनाधारकाने पुरेशा प्रमाणात खाजगी सुरक्षारक्षक तैनात करावयाचे असून सदर ठिकाणी कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उपआयुक्त, सर्व सहा पोलीस आयुक्त यांचे देखरेखेखाली एकुण २५० पोलीस अधिकारी, १२०० पोलीस अंमलदार, २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान रात्रभर कडक बंदोबस्तामध्ये तैनात असणार आहे.

नवीन वर्षाचे स्वागतप्रसंगी नागरिकांनी आनंदोत्सव साजरा करतांना कायदयाचे पालन करावे व कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता दक्षता घ्यावी. तसेच अडचणीच्या प्रसंगी गरज भासल्यास तात्काळ मदतीसाठी डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा याबाबत मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

---ooo---